शैक्षणिक संदर्भ अंक १४५ (डिसेंबर २०२३ - जानेवारी २०२४)

महा इतिहास - भाग २५

# दुभंगलेल्या जगाकडे वाटचाल - १

लेखक : प्रियदर्शिनी कर्वे



महा इतिहास - भाग २५

# दुभंगलेल्या जगाकडे वाटचाल - १

**लेखक : प्रियदर्शिनी कर्वे**

*मागील काही लेखांमधून आपण औद्योगिक क्रांतीच्या विविधांगी परिणामांची चर्चा करत आहोत. औद्योगिकीकरणामुळे युरोपीय देशांमध्ये नव्या राजकीय व्यवस्था कशा निर्माण होत गेल्या हे आपण मागच्या लेखात पाहिले. औद्योगिकीकरणाचा सर्वात मोठा जागतिक परिणाम म्हणजे युरोपीय देशांचा वसाहतवाद. यातून जगाचे अर्थकारण कसे पूर्णतः बदलून गेले व जग दोन गटांमध्ये कसे विभागले गेले, हे आता पाहूया.*

वसाहतवाद व देशादेशांतील स्वातंत्र्यलढ्यांचा अभ्यास करताना राजकीय घडामोडींवर जास्त भर दिला जातो. दुसऱ्या महायुध्दानंतर राजकीय वसाहतवाद टप्प्याटप्प्याने संपुष्टात आला. पण वसाहतवादाने बदलून टाकलेले जागतिक अर्थकारणातील प्रवाह मात्र अजूनही प्रभावशाली आहेत. जागतिकीकरण, मुक्त व्यापार, इ. गोंडस नावांखाली जगाच्या बऱ्याच भागांत आर्थिक वसाहतवाद अजूनही चालूच आहे.

भारत हा ग्रेट ब्रिटनच्या वसाहतवादाचा बळी ठरलेला एक महत्त्वाचा देश होता. या पारतंत्र्याच्या जोखडातून बाहेर पडण्यासाठी इथे लोकांच्या सहभागातून राजकीय चळवळ झाली. ब्रिटिशांच्याच शिक्षणातून अवगत केलेले लोकशाही मूल्यांचे व राज्यव्यवस्थेचे ज्ञान या चळवळीत कामी आले. त्यामुळे ब्रिटिश सत्ताधीश जेव्हा बाहेर पडले तेव्हा इथे पोकळी निर्माण झाली नाही, तर एक राजकीयदृष्ट्या परिपक्व व सक्षम अशी लोकांची फळी राज्यकारभाराची धुरा स्वीकारण्यासाठी तयार होती. दुसऱ्या महायुध्दानंतर सर्वच युरोपीय साम्राज्ये संपुष्टात आली, तेव्हा त्यांच्या अधिपत्याखालील इतर अनेक देशांत स्थानिक पातळीवर देशाचा कारभार चालवण्याचा कोणताच अनुभव व ज्ञान नव्हते. असे अनेक देश अजूनही राजकीय व आर्थिक पातळीवर चाचपडताना दिसतात.



*१७६५ मध्ये मुघल बादशहा शहा आलम याने बंगाल, बिहार व ओरिसाच्या करआकारणीचे अधिकार ईस्ट इंडिया कंपनीला सुपूर्द केल्याच्या प्रसंगाचे तैलचित्र (स्रोत – विकीपिडिया)*

भारतावर ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल बसण्यापूर्वी भारत हा जागतिक पातळीवरील सर्वात मोठा उत्पादक व निर्यातदार देश होता. ईस्ट इंडिया कंपनीने ग्रेट ब्रिटनमधील कारखान्यांत तयार झालेल्या स्वस्त उत्पादनांच्या साहाय्याने भारतात कुशल कारागिरांद्वारे उत्पादित होणाऱ्या दर्जेदार पण महाग उत्पादनांची मक्तेदारी संपुष्टात आणली.

भारतीय कारागिरांची रोजीरोटी बंद झाल्याने ते शेतीकडे वळले. भारताची शेतीप्रधान देश ही प्रतिमा यातूनच उभी राहिली आहे. ब्रिटिश अधिपत्याखाली भारतातून केवळ युरोपीय उद्योगांसाठी महत्त्वाच्या शेती उत्पादनांची निर्यात - तीही युरोपीय उद्योगांना सोयीच्या किंमतींना - होऊ लागली. ही उत्पादने होती - नीळ, ऊस, कापूस, आणि अफू.

आपल्या शेजारी चीनचा वसाहतवादाच्या छायेतील आर्थिक प्रवास बराच वेगळा होता. चीनवर कोणत्याच युरोपीय देशाचे थेट राजकीय वर्चस्व कधीच स्थापन झाले नाही, पण तरीही चीन हळूहळू युरोपीय देशांच्या आर्थिक प्रभावाखाली आला.

चीन हा मोठा आणि लोकसंख्येची घनता जास्त असलेला देश होता. युरोपियनांना अमेरिका खंडाचा शोध लागल्यानंतर तिथली अनेक पिके युरोपवाटे आशियात पसरली. चीनमध्ये मका, बटाटा, भुईमूग, इ. मूळच्या अमेरिकेतील पिकांची मोठ्या प्रमाणावर उपज होऊ लागली. अन्नसुरक्षिता सुधारल्याने चीनची लोकसंख्याही आणखी झपाट्याने वाढली. शेतीत अधिकाधिक लोक काम करत होते व त्यातून शेतीची उत्पादन क्षमता अधिकाधिक वाढत होती. चीनच्या लोकसंख्येच्या सर्व मूलभूत गरजा शेतीतून भागत होत्या. रेशीम, चिनीमातीची भांडी आणि चहा यांची निर्यात आणि चांदीची आयात असा चीनचा युरोपीय देशांबरोबरचा पूर्वापार चालू असलेला व्यापार होता.

१८०० साली अशी परिस्थिती होती, की ग्रेट ब्रिटनमधून चीनमध्ये मोठ्या प्रमाणावर चांदीचा ओघ चालू होता. ग्रेट ब्रिटनमधील खाणकामगार व कापड गिरण्यांतील मजूर आपल्या उत्पन्नाच्या ५ टक्के भाग चीनमधून येणाऱ्या चहावर खर्च करत होते. या बदल्यात ग्रेट ब्रिटन चीनला पुरवत असलेली चांदी कोठून येत होती? ब्रिटिश लोक आफ्रिकेतून गुलाम

आणून अमेरिका खंडात विकत होते व त्यांची किंमत चांदीच्या स्वरूपात घेत होते. हीच चांदी चीनबरोबरच्या व्यापारात चलन म्हणून वापरली जात होती. मात्र ब्रिटनमध्ये गुलामांच्या व्यापारावर बंदी आल्यानंतर ही आर्थिक साखळी विस्कळित झाली. यामुळे चहाची किंमत म्हणून चांदीऐवजी भारतात पिकवली जाणारी अफू घ्यावी, यासाठी ब्रिटिशांनी चिनी सम्राटांवर दबाव आणायला सुरूवात केली. पण ही जीवघेणी नशा विकत घ्यायला चिनी सम्राट तयार नव्हते.

१८३० साली ब्रिटिशांनी समुद्री खाडीतून नदीत जाऊ शकेल अशी पूर्ण लोखंडी युध्दनौका बनवली आणि तिचा वापर करून चीनविरुध्द युध्द पुकारले. १८४० व १८५० च्या दशकांत लागोपाठ झालेल्या दोन अफूच्या लढायांत (ओपियम वॉर) हार पत्करल्यावर चीनला आपल्या सागरी बंदरांवर अफू उतरवायला परवानगी देणे भाग पडले. याचा परिणाम असा झाला की १९व्या शतकाच्या शेवटी चीनमधील १० टक्के लोक अफूच्या व्यसनात अडकले होते व जगातील ९० टक्के अफू चीनमध्ये विकली जात होती. कित्येक शतके चांदी ग्रेट ब्रिटनमधून चीनमध्ये गेली होती. आता तिचा उलटा प्रवास सुरू झाला आणि जागतिक व्यापाराचे चित्रही पूर्णपणे बदलले. दरम्यान चीनमधील राजेशाही वाढत्या



*ईस्ट इंडिया कंपनीचे लोखंडी जहाज चिनी युध्दनौका उध्वस्त करत आहेत हे दाखवणारे तैलचित्र (स्रोत – विकीपिडिया)*

लोकसंख्येच्या गरजा भागवण्यात अपयशी ठरल्याने कमकुवत होत गेली व तिथे अनेक बंडाळ्याही झाल्या.

भारत आणि चीनकडे युरोपातून जाणारा खुश्कीचा मार्ग हा काहीशे वर्षे इस्लामिक साम्राज्यांमधून जात होता. यापैकी शेवटचे साम्राज्य म्हणजे ऑटोमान साम्राज्य. आजचा तुर्कस्तान केंद्रस्थानी असलेल्या ह्या साम्राज्यात शेतीवर आधारित नागरी संस्कृतीपासून पुढे फार प्रगती झाली नव्हती. पण भौगोलिक स्थानामुळे युरोप व चीन-भारत यांमधील व्यापारावर हे सम्राट नियंत्रण ठेवू शकले व त्यामुळे त्यांचे राजकीय महत्त्व १६व्या शतकापर्यंत टिकून होते. यानंतर मात्र युरोपियनांनी पूर्वेकडे येण्याचे सागरी मार्ग शोधून काढल्याने ऑटोमान साम्राज्याचा प्रभाव ओहोटीला लागला. १९व्या शतकात त्याची शकले झाली व हे तुकडेही कालांतराने युरोपीय वसाहतवादाच्या प्रभावाखाली आले. उदा. फ्रान्सने १८२०च्या दशकात अल्जेरियावर नियंत्रण मिळवले व युरोप-आशिया सागरी प्रवासाचा मार्ग खूपच सोपा व स्वस्त करणाऱ्या सुएझ कालव्याचे काम पूर्ण केले. १८७०नंतर या कालव्याचे नियंत्रण ग्रेट ब्रिटनने फ्रान्सकडून हिसकावून घेतले व पुढे इजिप्तवर नियंत्रण मिळवले.

एकंदरच १८व्या व १९व्या शतकांत युरोपचे व त्यातही ग्रेट ब्रिटनचे आशियावर राजकीय आणि व्यापारी वर्चस्व विविध मार्गांनी प्रस्थापित होत गेले.

अमेरिका व ऑस्ट्रेलिया खंडांत युरोपीय दर्यावर्दी पोहचले तोपर्यंत तिथले मूळनिवासी बाकीच्या जगापासून अलिप्त राहिलेले होते. युरोप-आशिया-आफ्रिकेतील सामाजिक, आर्थिक, राजकीय, वैज्ञानिक, तांत्रिक गुंतागुंतीच्या तुलनेत या लोकांचे जीवन खूपच साधे-सरळ होते व त्यांच्या संस्कृती अजूनही भटके शिकारी ते प्राथमिक स्वरूपाची शेती या

संक्रमणाच्या सीमेवरच रेंगाळलेल्या होत्या. शिवाय तिथे लोकसंख्येची घनताही कमी होती आणि युरोपियनांच्या संपर्कातून पसरलेल्या रोगराईमुळे ती आणखी कमी झाली. परिणामी या खंडांतील युरोपीय वसाहतवाद आशिया व आफ्रिकेतील वसाहतवादापेक्षा वेगळ्या मार्गाने फोफावला. मूळ निवासी लोकांना हुसकावून लावून इथल्या जमिनी व साधनसंपत्तींवर युरोपियनांनी आपले नियंत्रण प्रस्थापित केले. त्यामुळे युरोपीय राज्यकर्त्यांच्या नियंत्रणाखालील युरोपियन लोकांचीच वसाहत असे वेगळे प्रारूप इथे उदयाला आले.

१९व्या शतकाच्या सुरुवातीला स्वदेशात रहाणाऱ्या आपल्याच भाऊबंदांच्या तुलनेत आपल्याला मिळणाऱ्या सापत्न वागणुकीने त्रस्त होऊन अमेरिका खंडातील वसाहतींनी बंडे पुकारली, युध्दे केली व त्यातून तिथे स्वतंत्र देश निर्माण झाले. पण हे स्वातंत्र्य फक्त गोऱ्या लोकांसाठीच होते, मूळनिवासी व गुलामांवर युरोपीय वसाहतवादाचा वरवंटा अगदी आधुनिक काळापर्यंत फिरत राहिला.



*बिटाच्या शेतात काम करणारे अफ्रिकी गुलाम (१८६२) (स्रोत – विकीपिडिया)*

कानामागून येऊन तिखट झालेल्या गोऱ्यांचे हे बेगडी स्वातंत्र्यही केवळ राजकीय होते. उत्तर अमेरिकेतील संयुक्त संस्थानांचा अपवाद वगळता दक्षिण अमेरिकेतल्या मूळच्या युरोपियनांच्या स्वतंत्र देशांत औद्योगिक क्रांतीचा शिरकाव

झाला नाही. मुख्यतः शेतीच्या माध्यमातून युरोपला लागणारा कच्चा माल आफ्रिकी गुलामांच्या श्रमाचा वापर करून पिकवणे व तो युरोपातील कारखानदारांना पुरवणे यावरच यांचे अर्थकारण २०व्या शतकापर्यंत अवलंबून राहिले.

वसाहतवादाचे दूरगामी राजकीय आणि आर्थिक परिणाम पाहायचे असतील तर आफ्रिका खंडाचा इतिहास पाहावा लागेल. याबद्दल अधिक, पुढच्या लेखात.

*या लेखमालेसाठी संदर्भ म्हणून डेव्हिड ख्रिश्चन व सहकाऱ्यांनी लिहिलेल्या 'बिग हिस्टरी - बिट्विन नथिंग अँड एव्हरिथिंग' या पुस्तकाचा आधार घेण्यात आला आहे.*

§§§

---

लेखक : **प्रियदर्शिनी कर्वे,** संचालक, समुचित एन्व्हायरो टेक, शैक्षणिक संदर्भ संपादक गटात सहभागी.

**इ-मेल :** pkarve@samuchit.com

*(कळीचे शब्द: वसाहतवादाचे अर्थकारण, भारत, चीन, आशिया, आफ्रिका, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, चहा, चांदी, अफू, आफ्रिकी गुलाम)*

# शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

**२०१८ सालापासून 'शैक्षणिक संदर्भ' या इ-अंकातील दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिन्यांनी आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे इमेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून आपल्यापर्यंत आम्ही नियमित पोहोचवत आहोत. आम्ही करत असलेला हा प्रयास किती वाचकांना आवडतो/ उपयोगी पडतो याबद्दल आम्हाला जाणून घ्यायला आवडेल.**

- **आपल्याला आमचे लेख व अंक नियमित मिळतात का ?**
- **आपण दरमहा किती लेख वाचता ?**
- **त्यातील किती लेख आवडतात ?**
- **त्यावर आपण कधी प्रतिक्रिया, सूचना दिली आहे का ?**

**याबद्दल आम्हाला sandarbh.marathi@gmail.com या इमेलवर जरूर कळवा.**

**आमच्या www.sandarbhsociety.org या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंक त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत. वाचू शकता, डाऊनलोड करू शकता.**

या उपक्रमासाठी आपली ऐच्छिक देणगी संदर्भ सोसायटीकडे खालील अकाऊंटमध्ये जमा करू शकता, केल्यानंतर वरील इ-पत्त्यावर तशी मेल करा.. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.

इ-पेमेंट : Sandarbh Society

Account No.: 20047006634

Bank of Maharashtra, Mayur Colony, Pune

IFS Code: MAHB0000852

- **संपादक मंडळ, शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी**